Jagdamba Education Society's

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

SND POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 27/03/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## अभिनेते, गायक भार्गवराम आचरेकर

भार्गवराम आचरेकर हे मराठी रंगभूमी गाजवलेले नामवंत मराठी गायक-नट होते. स्त्रीपात्र भूमिकांसाठी ते विशेष प्रसिद्ध होते. त्यांना प्रेमाने मामा आचरेकर असेही म्हटले जाई. त्यांनी 'सोन्याचा कळस' या नाटकात केलेली 'बिजली'ची भूमिका विशेष गाजली. त्यांचा जन्म १० जुलै १९१० रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यात आचरा या गावी झाला. आचरेकरांच्या लहानपणीच त्यांच्या माता-पित्यांचे निधन झाले. त्यांचे मोठे बंधू अवधूत आचरेकर यांनीच त्यांचा सांभाळ केला आणि संगीत शिकवले. बापूसाहेब पेंढारकरांच्या कानी या बालनटाची कीर्ती पडली. त्यांनी भार्गवरामांचे गाणे ऐकले आणि आपल्या संस्थेत दाखल करून घेतले.

'कुंजविहारी' नाटकातील 'कृष्ण' ही भार्गवराम यांची पहिली भूमिका. यानंतर 'वधूपरीक्षा', 'शारदा', 'पुण्यप्रभाव' इत्यादी अनेक नाटकात ते भूमिका करू लागले. बापूसाहेब पेंढारकर आजारी पडल्यानंतर त्यांनी 'मानापमाना'तील धैर्यधर आणि 'शिक्काकट्यार' मधील शाहू या अवघड संगीत भूमिका केल्या. भार्गवराम १९२४ ते १९३६ अशी बारा वर्षे 'ललितकलादर्शन नाटक मंडळी'मध्ये होते. या दरम्यान त्यांच्या संगीत नाटक क्षेत्रातील कारकिर्दीने अभूतपूर्व असा उच्चांक गाठला. या काळात त्यांना जयपूर घराण्याचे गायक पं. पणशीकरबुवा, विष्णूपंत पागनीस, कागलकरबुवा आणि रामकृष्ण वझेबुवा अशा मातब्बर मंडळींकडून तालीम मिळाल्याने त्यांची गायकी कसदार आणि दर्जेदार झाली. दरम्यान, भार्गवराम विठ्ठल वरेरकरांनी लिहिलेले 'सोन्याचा कळस' हे नाटक रंगभूमीवर आले होते. आचरेकरांनी त्यात 'बिजली'ची भूमिका साकारली. या भूमिकेने आचरेकरांनी मराठी नाट्यसृष्टीवर आपली लखलखती मोहोर उमटवली. नाट्य परिषदेने त्यांना 'बालगंधर्व पदक' देऊन गौरविले होते. भार्गवराम आचरेकर यांचे २७ मार्च १९९७ रोजी पुण्यात निधन झाले.

Nashik Edition

Mar 27, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401